**मध्य रेल्वे कार्यालय**
**उप मुख्य अभियंता निर्माण, दौंड, रेल्वे स्टेशन जवळ अहमदनगर-४१४००५**
**कार्यालय फोन :- ०२४१-२४७२११८**

**D.D. / W / C.N. / D.R.G. / D.-19** **Date : 16 / 09 / 2022**

**प्रति,**

**मा. उपवनसंरक्षक,**
**(वन्यजीव) पुणे**

**विषय :** Ranjangaon to Ukhalgaon Doubling of Railway line a part of Daund - Manmad Doubling of Railway track Project Daund- Manmad Railway.

**संदर्भ :** १. आपलेकडील पत्र क्र.कक्ष-३/सर्वे-जमिन/एफसीए/१२११/सन २०२१-२२ दि. ०८/१२/२०२१
२. आपलेकडील पत्र क्र.कक्ष-३/सर्वे-जमिन/एफसीए/९०५/सन २०२२-२३ दि. ०५/०८/२०२२

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने रांजणगांव ते उखलगांव डबलींग रेल्वे लाइन बाबतचा वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत ३.३० हेक्टर वनजमिन वळतीकरण करणेबाबतचा प्रस्ताव विहीत प्रपत्रात तयार करुन आपले कार्यालयास एक प्रतीत तपासणीसाठी पाठविण्यात आलेला होता. त्यामध्ये उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये १ ते ६ त्रुटी उपस्थित केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने सदर १ ते ६ त्रुटींचा पुर्तता अहवाल विहीत प्रपत्रात खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | उपस्थित त्रुटी | त्रुटींचा पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| १ | प्रस्ताव १ प्रतीत आहे सदरचा प्रस्ताव ७ प्रतीत सादर करावा. | सदरचा प्रस्ताव ७ प्रतीत सादर केलेला आहे. |
| २ | प्रस्तावामध्ये पर्यायी वनीकरणाचे स्कीम, नकाशे, क्षेत्र, गाव याचा उल्लेख नाही. | केंद्र शासनाकडील मार्गदर्शक सुचनेनूसार पर्यायी वनीकरणाची योजना वनविभागाकडील दुप्पट अवनत वनक्षेत्रावर राबवावयाची असल्याने सदरचा मुद्दा आपले वनविभागाशी संबंधित आहे. |
| ३ | प्रस्ताव ऑनलाईन भरल्याबाबतची प्रत व रिसीप्ट जोडली नाही. | सदर प्रस्ताव ऑनलाईन भरल्याबाबत पार्ट-१ ची प्रत सोबत जोडली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४ | प्रस्तावामध्ये Non Forest land ची माहिती दिसुन येत नाही. | प्रस्तावीत रांजणगांव ते उखलगांव डबल रेल्वे लाइनचे काम केवळ रेल्वे विभागाच्या ताब्यातील अस्तित्वात असलेल्या रुंदीमध्येच होणार असल्यामुळे कोणत्याही वनेत्तर क्षेत्राचा समावेश होत नाही. त्यामुळे वनेत्तर क्षेत्र दर्शविण्यात आलेले नाही. |
| ५ | प्रस्तावामध्ये जिल्हाधिकारी कडील वनहक्क कायदा २००६ अंतर्गतचे प्रमाणपत्र नाही. | मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी द्यावयाचे वनहक्क कायदा-२००६ चे प्रमाणपत्र मिळणेकामी या कार्यालयाकडुन पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर प्रमाणपत्र जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडुन प्राप्त झालेनंतर सादर करण्याची दक्षत घेत आहे. |
| ६ | सदर प्रस्तावामध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी मा.प.अ. श्रीगोंदा यांनी वनभंग झालेने, वनगुन्हा नोंदविला आहे. त्याअनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी मा.प.अ. श्रीगोंदा यांचेशी संपर्क करुन वनगुन्हयाबाबत चौकशी करुन वनगुन्हा नस्तीबध्द करणेकामी सहकार्य करावे. | सहाय्यक वनसंरक्षक मा.प.अ. उपवनसंरक्षक (वन्यजीव) पुणे यांचेकडील पत्र क्र.कक्ष-५/गुन्हे/१४५८/२०२२-२३ दिनांक १५/०९/२०२२ अन्वये सदर वनगुन्हा निकाली काढलेला आहे. |

16/09/22

**(दीपक कुमार)**
**उपमुख्य अभियंता (निर्माण) दौंड @ अहमदनगर,**
**मध्य रेल्वे अहमदनगर**

**प्रतिलिपी :** मुख्य अभियंता (निर्माण) मध्य, छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनल, मुंबई यांना माहितीस्तव.